आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

रविवार, दिनांक : ११ ऑगस्ट, २०२४

ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत सुपीक, हवामानास अनुकूल आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या 109 वाणांचे केले वाटप.
2. कापूस-सोयाबीन अर्थसहाय्यासाठी प्रतिहेक्टरी 5 हजारांचे अनुदान; ई-पीक पेरा नोंदणी असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना मिळणार लाभ.
3. लोकसभेची निवडणूक महाविकास आघाडी विरुद्ध नाही तर थेट चुकीच्या प्रचाराविरुद्ध लढल्यामुळे लोकसभेच्या जागा कमी झाल्या असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं अकोल्यात प्रतिपादन.
4. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा आज समारोप : एक रौप्य आणि पाच कास्यपदकांसह पदक तालिकेत भारत ७१ व्या स्थानी.

#####

**पंतप्रधान / 109 वाणांचे वाटप**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीतल्या भारत कृषी संशोधन संस्था इथं पिकांच्या अत्यंत सुपीक, हवामानास अनुकूल आणि जैवसंवर्धन केलेल्या 109 वाणांचं वाटप केलं. यात 61 पिकांच्या 109 वाणांमध्ये 34 शेतीपिके आणि 27 फळ बागायती पिकांचा समावेश आहे. शेतातील पिकांमध्ये बाजरी, चारा पिके, तेलबिया, कडधान्ये, ऊस, कापूस, तृणधान्ये आणि इतर फायदेशीर पिकांसह विविध बियाण्यांचं वाटप करण्यात आलं. बागायती पिकांमध्ये विविधप्रकारची फळे, भाजीपाला पिके, लागवड पिके, कंदमुळे, मसाले, फुले आणि औषधी पिकांचं वाटप करण्यात आलं. पंतप्रधानांनी यावेळी शेतकरी आणि शास्त्रज्ञांशी संवाद साधला. या नवीन पिकांच्या वाणांच्या विकासाबद्दल पंतप्रधानांनी शास्त्रज्ञांचीही प्रशंसा केली.

**वक्फ दुरुस्ती विधेयक**

वक्फ दुरुस्ती विधेयक, २०२४ चं पुनरावलोकन करण्यासाठी स्थापन केलेली ‘जेपीसी’ अर्थात, संयुक्त संसदीय समिती, हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याच्या, शेवटच्या दिवशी लोकसभेला आपला अहवाल सादर करेल, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी काल सोशल मीडियावरील संभाषणा दरम्यान दिली. या प्रकरणाच्या सुनावणीची तारीख ही संसदीय समिती जाहीर करेल. मुस्लिमांसह, सकारात्मक योगदान देऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही संस्था किंवा व्यक्तींला या समितीच्या कामकाज प्रक्रियेत सहभागी होता येईल, असं त्यांनी सांगितलं.

**कापूस-सोयाबीन अर्थसहाय्य**

वर्ष 2023 मधील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसहाय्य दिलं जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या आधार व बँक खात्याशी संलग्न असलेल्या माहितीचा वापर व्हावा यासाठी त्यांचे वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक ना हरकत

पत्र आपल्या कृषी सहाय्यकाकडे जमा करणे आवश्यक असल्याचं कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितलं आहे.

2023 च्या खरीप हंगामामध्ये कापूस व सोयाबीनचे कमी दर मिळाल्याने शेतकऱ्यांना झालेल्या आर्थिक नुकसानीवर उपाययोजना म्हणून राज्य शासनाने मागील वर्षीच्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे, दोन हेक्टर पर्यंत मदत देण्याच्या निर्णय घेतला आहे. ही मदत रक्कम सोयाबीन - कापूस उत्पादक असलेल्या व ज्यांनी ई-पीक पेऱ्यांची नोंदणी केलेली आहे अशा सर्व शेतकऱ्यांना दिली जाणार आहे.

**के. नटवर सिंग निधन**

काँग्रेस नेते आणि माजी परराष्ट्र मंत्री के नटवर सिंह यांचं काल रात्री दीर्घ आजाराने निधन झालं . तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारच्या काळात 2004-05 मध्ये त्यांनी भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री म्हणून काम पाहिलं होतं. त्यांनी पाकिस्तानमध्ये भारताचे राजदूत म्हणूनही काम केलं आहे. १९८४ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. नटवर सिंग यांनी अनेक पुस्तकंही लिहिली आहेत. माजी परराष्ट्र मंत्री नटवर सिंग यांच्या निधनाबद्दल उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. 'मुत्सद्देगिरी आणि परराष्ट्र धोरणात त्यांनी भरीव योगदान दिल्याचं' मोदी यांनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे.

**नीट पदव्यूत्तर प्रवेश परीक्षा**

नीट पदव्यूत्तर प्रवेश परीक्षा आज दोन सत्रांमध्ये पार पडली. सुमारे दोन लाखांहून अधिक विद्यार्थी प्रवेश परीक्षेला बसले होते . जूनमध्ये परीक्षेच्या नियोजित तारखेच्या एक दिवस आधी ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. स्पर्धा परीक्षांवर झालेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला होता.

**सुधीर मुनगंटीवार**

राज्य शासनाने अर्थसंकल्पामध्ये पीक विमा योजनेसाठी तरतूद करूनसुद्धा ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी, शेतकऱ्यांना नुकसानग्रस्त शेतीच्या विम्याची रक्कम देण्यास टाळाटाळ करीत होती. याबाबत शेतक-यांच्या अनेक तक्रारी होत्या. या तक्रारींची दखल घेऊन केवळ पाच दिवसांत चंद्रपूर इथं दोन बैठका तर मुंबई येथे कृषीमंत्री आणि सचिवांच्या उपस्थितीत तातडीने बैठक घेण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पात्र शेतक-यांचा, पीक विम्याचा प्रश्न निकाली निघाला असून जिल्ह्यात प्रथमच पीक विम्याची 202 कोटी 76 लाखांची रक्कम 31 ऑगस्टपर्यंत मिळणार असल्याचे समाधान आहे, अशा भावना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिलह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या. चंद्रपुरात नियोजन भवन इथं प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा आढावा घेतांना ते बोलत होते.

**सुप्रिया सुळे**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांचा मोबाईल हॅक झाला असून त्यातील व्हाट्सअप सुद्धा हॅक झाले आहे. त्यामुळे आपल्याला कोणीही थेट फोन किंवा संदेश पाठवू नये, असं आवाहन खासदार सुळे यांनी आपल्या एक्स खात्यावरून केलं आहे.

**फडणवीस**

आपण लोकसभेची निवडणूक महाविकास आघाडी पक्षासोबत नाही तर थेट चुकीच्या प्रचारासोबत लढलो, त्यामुळे आपल्या लोकसभेच्या जागा कमी आल्या, असं वक्तव्य भारतीय जनता पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते भाजपच्या जिल्हा विस्तारित कार्यकारणी बैठकिसाठी आज अकोल्यात आले होते.

तथाकथित पत्रकार आणि काही सोशल मीडियाच्या लोकांनी भाजप संविधान बदलणार, आरक्षण समाप्त करणार अशा अफवा पसरविल्या. त्यामुळे अतिशय कमी फरकाने आपण निवडणूक हरलो. पण जे खोटं असतं त्यांचं वय छोटं असतं असं फडणवीस म्हणाले.

आरक्षण वाढविण्याचं काम दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारने केलं आहे. आमच्या सरकारने 'लाडकी बहीण योजना' आणली. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला. विदर्भाचा दुष्काळ संपवणाऱ्या पैंनगंगा प्रकल्पास मान्यता दिली. या प्रकल्पामुळे 10 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून विदर्भाचा दुष्काळ संपणार आहे. या प्रकल्पामुळे अकोला, वाशिम, बुलढाणा या जिल्ह्यातील शेती सिंचनाखाली येणार आहे, अशी माहिती यावेळी फडणवीस यांनी दिली. शिवाय भाजप कार्यकर्त्यांनी लाडक्या बहिणीच्या संपर्कात राहून त्यांचे लाडके भाऊ कोण आहेत हे दाखवून द्यायला पाहिजे, असं आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केलं.

**पॅरिस ऑलम्पिक**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा समारोप आज होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री साडेबारा वाजता हा समारोपाचा समारंभ सुरू होईल. सुमारे ८० हजार प्रेक्षकांच्या उपस्थिती'त स्टेड दे फ्रान्स' स्टेडिमयममध्ये हा कार्यक्रम पार पडेल. दोनवेळा ऑलिम्पिक पदकविजेती नेमबाज मनू भाकर आणि हॉकी संघाचा गोलकीपर पी. आर. श्रीजेश या कार्यक्रमात भारताचे ध्वजधारक असतील. पुढलं ऑलिम्पिक २०२८ मध्ये लॉस अँजेलिस इथं होणार आहे. पॅरिस ऑलम्पिक मध्ये भारत एक रौप्य आणि पाच कास्यपदकांसह ७१ व्या स्थानावर आहे. चीन एकूण ३९ सुवर्ण पदकांसह पहिल्या स्थानावर असून अमेरिका दुसऱ्या तर ऑस्ट्रेलिया तिसऱ्या स्थानावर आहे. दरम्यान, भारतासाठी पहिलंवहिलं वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणारा नेमबाज अभिनव बिंद्रा याला काल आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या कार्यक्रमात प्रतिष्ठित ऑलिम्पिक ऑर्डर पुरस्कारानं गौरवण्यात आलं. तर भारताची कुस्तीपटू विनेश फोगाट हिला अपात्र ठरवण्याच्या निर्णयाविरोधात तिनं दाखल केलेल्या याचिकेवर ऑलिम्पिक क्रीडा लवादाचा निकाल १३ ऑगस्ट रोजी येण्याची शक्यता आहे.

**हर घर तिरंगा**

शासन निर्देशानुसार ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान देशव्यापी 'घरोघरी तिरंगा ' मोहीम राबवण्यात येत आहे. देशातील प्रत्येक नागरिकाच्या मनात देशभक्ती जागृत करणे हा अभियानाचा उद्देश आहे. 'हर घर तिरंगा' अभियाना अंतर्गत **चंद्रपूर** महानगरपालिकेतर्फे मंगळवार दिनांक १३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता बाईक रॅलीचं आयोजन प्रियदर्शिनी चौक इथं करण्यात आलं असून यात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

तर नागपुरात "तिरंगा बाईक रॅली" उद्या सकाळी १० वाजता **नागपूर** महानगरपालिका मुख्यालयातून निघेल आणि निर्धारित मार्गावर भ्रमंती करून मनपा मुख्यालयात रॅलीचा समारोप होईल. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील तळमजल्यावर मोठा तिरंगा ठेवण्यात आलेला आहे. या तिरंग्यासोबत सेल्फी काढून अधिकारी आणि कर्मचारी harghartiranga.com या संकेतस्थळावर अपलोड करीत आहेत.

**बोगस बियाणे**

महाशक्ती आर. आर. (HTBT) किंवा बी.जी. 3 ईत्यादी नावाने बाजारात आलेले अनधिकृत बियाणे शेतकऱ्यांनी खरेदी करू नये असं आवाहन वर्धा जिल्हा कृषि विकास अधिकारी, संजय बमनोटे यांनी केलं आहे. अनधिकृत बियाणे कोणत्याही प्रकारची चाचणी न होता बाजारात आलेले असते त्यामुळे यापासून शेतकऱ्यांचं नुकसान होतं. अशा अनधिकृत खरेदी केलेल्या बियाण्याचे कोणतेही बिल किंवा परवाना नसतो त्यामुळे शेतकऱ्यांना अशा बोगस बियाण्यामुळे नुकसान झाल्यास कोणतीही नुकसान भरपाई शासनामार्फत देण्यात येत नाही.

**हवामान**

संपूर्ण विदर्भात येत्या १५ तारखेपर्यंत वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता आहे. दरम्यान पुढील काही तासांत भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, आणि गडचिरोली जिल्ह्यांत गडगडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.

#####